# पनवेल नगर परिषद
## बांधकाम परवानगी

पनप/अकृषि-४७७,४७९/(बांधा)/२०५
परवानगी क्र.२
दिनांक : १९ / ४ / २००६

## परिशिष्ट -- अ

अटी :

१) जागेच्या मालकी हक्काची, वहिवाटी व आजूबाजूचे मालमत्ता मालकीची हर एक प्रकारचे तक्रारीसंबंधी सर्व जबाबदारी अर्जदारावर राहील.

२) प्रस्तावित भूखंड बिनशेती परवानगी मिळालेला असावा, नसल्यास महसूल खात्याकडून बिनशेती परवानगी घेतल्यानंतर बांधकाम करणेस सुरुवात करावी.

३) बांधकाम करण्यापूर्वी भूखंडाचे / मालमत्ता ही तालुका निरीक्षक व भूमी अभिलेख खात्याकडून सिमांकन करावे व त्यानंतर बांधकामास सुरुवात करावी.

४) सर्व बांधकाम / दुरुस्ती सोबतच्या मंजूर नकाशाप्रमाणे करावे / करावी.

५) बांधकाम करतांना शेजारी असलेल्या मालमत्ताधारकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) बांधकाम करण्यास पनवेल नगर परिषदेकडून कोणत्याही प्रकारची पाण्याची व्यवस्था होणार नाही.

७) सांडपाण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी.

८) नियोजित इमारतीच्या मालकीचे, विकासकाचे, वास्तुविशारद व ठेकेदार यांची संपूर्ण नावे व पत्ते, नियोजित इमारतीच्या जागेचा सर्वे नंबर / सिटी सर्वे नंबर/ मालमत्ता नंबर / अं.भू.क्र.आणि प्रभाग क्र. अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र/ निवासी व वाणिज्य गाळ्यांची संख्या व त्यांचे क्षेत्रफळ, तपशीलवार मंजूर नकाशाची प्रत ज्या ठिकाणी पाहण्यासाठी उपलब्ध असेल त्या ठिकाणचा खुलासा, सदरचा तपशील ज्या ठिकाणी रहिवास व वाणिज्य वापर प्रस्तावित असेल त्या भागातील दोन वर्तमानपत्रात देण्यात यावा. त्यामधील एक स्थानिक भाषेमधील (मराठी) असावे.